# महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

☎ : २४०१०४३७/ २४०२०७८१/ २४०१४७०१
फॅक्स : २४०२४०६८
visit us at : http//mpcb.gov.in
email : enquiry@mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, २/ ३/ ४ था माळा,
सिनेट प्लॅनेट समोर, सायन सर्कल,
सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२.

क्रमांक : मप्रनि/ सस (तां)/ ब- 9982

दिनांक : 20 .०४. २०१५.

## प रि प त्र क

विषय : प्रदुषणकारी उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्याबाबत.....

संदर्भ : १. म.प्र.नि.मंडळाचे कार्यालयीन आदेश क्र. कार्यालयीन आदेश क्र.ई-२८/ २०००, दि.१५.०३.२०००.

२. म.प्र.नि.मंडळाचे कार्यालयीन परिपत्रक पत्र क्र. बीओ/ पी.अँड एल.डिव्ही./ ब-५०६५, दि.०१.०८.२००९.

३. म.प्र.नि.मंडळाचे कार्यालयीन परिपत्रक पत्र क्र. एमपीसीबी/ एमएस/ २०१०-ब-४५०३, दि.१५.०७.२०१०.

४. म.प्र.नि.मंडळाचे कार्यालयीन पत्र क्र. एमपीसीबी/ प्रवैअ/ ब-४६४, दि.०४.०२.२०१५.

५. म.प्र.नि.मंडळाचे कार्यालयीन परिपत्रक पत्र क्र. एमपीसीबी/ सस (तां.)/ ब-९८२, दि.१७.०३.२०१५.

म.प्र.नि.मंडळामार्फत गंभीर प्रदुषणाच्या प्रकरणामुळे जसे-वायु गळती, प्रदूषण नियंत्रण यंत्रणा न उभारणे, प्रदूषण नियंत्रण यंत्रणा न चालविणे आणि अप्रकियाकृत औद्योगिक सांडपाण्याची निर्गती होऊन पर्यावरणाचे प्रदूषण होणे, परिणामतः नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होणे व पाणवनस्पतींचे ऱ्हास होणे, याबाबत संबंधित प्रादेशिक अधिकाऱ्यांना म.प्र.नि.मंडळामार्फत जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ अंतर्गत कलम ३३ अ अन्वये आणि हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ अंतर्गत कलम ३१ अ अन्वये प्रदुषणकारी उद्योगांवर कारवाई करण्याबाबत संदर्भ क्र.-१ अन्वये आदेश जारी करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये आपातकालिन स्थानिक परिस्थितीनुसार प्रादेशिक अधिकारी यांना उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे आदेश देण्याबाबतचे अधिकार प्रदान केलेले आहेत. तद्नंतर सदर परिपत्रकाचा गैरवापर न करता वस्तुस्थितीवर आधारित प्रादेशिक अधिकारी यांनी निर्णय घेण्याचे सुचविले आहे. सर्व प्रादेशिक अधिकारी यांनी जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ अंतर्गत कलम ३३ अ अन्वये आणि हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ अंतर्गत कलम ३१ अ संदर्भात आवश्यक त्या सर्व कारवाई त्यांच्यामार्फतच करणे अपेक्षित असतांना (उदा.प्रस्तावित निर्देश, अंतरिम निर्देश, उत्पादन बंद करण्याचे आदेश, इ.) अलिकडेच वेगवेगळया ठिकाणी घडलेल्या आपातकालिन परिस्थितीमध्ये असे निदर्शनास आले की, अशा आपातकालिन परिस्थितीमध्ये सुचनांचे प्रादेशिक अधिकारी यांनी वरील आदेशांचे पालन न करता प्रस्ताव मुख्यालयास पाठविल्याचे दिसून येते. त्यामुळे सदर कारवाईस अनावश्यक विलंब होतो.

वरील परिस्थितीच्या अनुषंगाने, या परिपत्रकाव्दारे प्रादेशिक अधिकारी यांनी खालीलप्रमाणे मार्गदर्शकसुचनांचा अवलंब करावा.

१. ज्या परिस्थितीमध्ये मोठया प्रमाणामध्ये पर्यावरणाची हानी होत असेल. उदा.वायु गळती, मोठया प्रमाणात प्रक्रिया न केलेले सांडपाणी नदी/ नाल्यात किंवा पाण्याच्या स्त्रोतांमध्ये थेट सोडणे.

२. सांडपाणी सोडल्यामुळे पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बाधित होणे.

३. मोठया प्रमाणावर हवेच्या उत्सर्जनामुळे आरोग्यावर / पर्यावरणावर विपरित परिणाम होण्याची शक्यता.

४. एखाद्या उद्योगामध्ये अपघात होऊन आजुबाजुच्या परिसरावर विपरित परिणाम होणे, उदा-रिॲक्टर फुटणे, इ. ..२..

अशा वरीलपैकी कोणत्याही परिस्थितीमध्ये प्रादेशिक अधिकारी यांनी सदर उद्योगावर तातडीने सुरक्षित पध्दतीचा अवलंब करुन उद्योगाचे उत्पादन बंद करण्याचे आदेश तात्काळ जारी करावेत. तसेच याबाबतच्या कार्योत्तर मान्यतेसाठी तातडीने त्याचदिवशी ई मेल व्दारे मा.सदस्य सचिव यांना प्रस्ताव सादर करावा. तसेच एसएमएस अथवा भ्रमणध्वनीव्दारे मा.सदस्य सचिव यांचेशी केलेल्या कार्यवाहीबाबत अवगत करावे.

सर्व प्रादेशिक अधिकारी यांना या परिपत्रकाव्दारे पुनःश्च कळविण्यात येते की, वरील मार्गदर्शक सुचनांचा काटेकोरपणे अवलंब करावा. अन्यथा न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

सदर परिपत्रक तात्काळ अंमलात येत आहे.

(डॉ.पी.अन्बलगन)
सदस्य सचिव

**प्रत सविनय सादर,**

**मा.अध्यक्ष,** म.प्र.नि.मंडळ, मुंबई.

**प्रत,**

१ **सह संचालक-हप्रनि/ सहा.सचिव (तां.)/ सह संचालक-जप्रनि,** म.प्र.नि.मंडळ, मुंबई.
२ **प्रधान वैज्ञानिक अधिकारी/ विधी अधिकारी** - मुख्यालय / विधी शाखा, म.प्र.नि.मंडळ, मुंबई.
३ **प्रादेशिक अधिकारी (मुख्यालय),** म.प्र.नि.मंडळ, मुंबई.
४ **प्रादेशिक अधिकारी,** म.प्र.नि.मंडळ, मुंबई/ ठाणे/ कल्याण/ नवी मुंबई/ रायगड/ पुणे/ कोल्हापूर/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर/ चंद्रपूर.